16

**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक ३०/०३/२०२४**

आरोपी लोकसेवक- 1)डॉ. शामकांत दत्तात्रय गावंडे, वय 49 वर्षे, पद- तालुका आरोग्य अधिकारी (वर्ग-2) 2) श्री. पंडीत भिमराव कळकुंबे, वय 42 वर्षे, पद- कनिष्ठ सहाय्यक, दोन्ही नेमणुक- तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय अबंड, जिल्हा जालना यांनी तक्रारदार यांच्याकडून 20000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे अंबड,जिल्हा जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | 1) डॉ. शामकांत दत्तात्रय गावंडे, वय 49 वर्षे, पद- तालुका आरोग्य अधिकारी (वर्ग-2) 2) श्री. पंडीत भिमराव कळकुंबे, वय 42 वर्षे, पद- कनिष्ठ सहाय्यक, दोन्ही नेमणुक- तालुका आरोग्य अधिकारी, कार्यालय अबंड, जिल्हा जालना |
| लाच मागणी रक्कम | :- | 20000/- रुपये तडजोडी अंती. |
| लाच स्विकृती रक्कम | | 20000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. हनुमंत वारे, पोलीस निरीक्षक , लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांनी मानव विकास अंतर्गत घेतलेल्या आरोग्य शिबीराची बिले पडताळणी करुन मंजुरी करिता पंचायत समिती अंबड जिल्हा जालना येथे पाठविण्याकरिता. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार हे प्राथामीक आरोग्य केंद्र, वडीगोद्री व जामखेड ता. अंबड, जिल्हा जालना येथे वैद्यकिय अधिकारी पदावर कार्यरत असून तक्रारदार यांनी त्यांच्या आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये मानव विकास अंतर्गत घेतलेल्या आरोग्य शिबीराची बिले पडताळणी करुन मंजुरी करिता पंचायत समिती अंबड जिल्हा जालना येथे पाठविण्याकरिता प्रती बील 1000/-रुपये प्रमाणे आरोपी लोकसेवक क्रं.1 डॉ. शामकांत गावंडे यांनी तक्रारदार यांच्याकडे 20000/-रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि.19/03/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्रं.1 डॉ. शामकांत गावंडे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 20000/-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आज दि. 30/03/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. क्रं.2 श्री. पंडित कळकुंबे यांनी आ.लो.से.क्रं.1 डॉ.शामकांत गावंडे यांचे सांगणेवरुन तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय अंबड येथे 20000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन अंबड, जिल्हा जालना येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत वारे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार साईनाथ तोडकर, पो.अं. विलास चव्हाण, युवराज हिवाळे चालक चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.